Vidyaniketan English Medium School
Tal.Khed Dist.Pune
★ Chakan ★

**कायम विना अनुदानित तत्वावरील प्राथमिक शाळांचे परवानगी आदेश.**

महाराष्ट्र शासन

क्रमांक: नप्राशा १००५/(७६/२००५)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक १६ जून २००५

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक / पुणे.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ०५ ( पाच ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : पीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री

C:\ARUN\MARATHI FILE\2005-2006\NEW PERMISSION\English 16-05-16 07 05 FORWARDING

Scanned by CamScanner

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501

करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सं. उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(सु.हि. उगरणीकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक / पुणे.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan, Tal Khed, Dist Pune 410501

Vidyaniketan English Medium School
Tal.Khed, Dist.Pune
Chakan

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००५/(७६/०५)/प्राशि-३,दिनांक : १६ जुलै, २००५ चे सहपत्र.

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे.

## जिल्हा - नासिक.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | हिमालया एज्युकेशन सोसायटी, सं. नं. ९५५/७६, राव प्लॉट नं.९, विद्याविलास हौसिंग सोसायटी, शिवाजी नगर, पुणे १६ | वडांगळी, ता.सिन्नर, जि.नासिक | इंग्रजी | १ ली |

## जिल्हा - पुणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | स्व. गुलाबराव गोरे प्रतिष्ठाण, चाकण, ता. खेड | चाकण, ता.खेड | इंग्रजी | १ ली |
| ३ | श्री. एस.पी. देशमुख शिक्षण संस्था, मु.पो. चाकण, ता.खेड | चाकणगांव, ता.खेड | इंग्रजी | १ ली |
| ४ | दि व्हाईट ॲण्ड मॉर्निंग स्टार एज्युकेशन सोसायटी, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे | सुखसागरनगर, कात्रज, जि.पुणे ४८ | इंग्रजी | १ ली |
| ५ | क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले एज्युकेशन फौंडेशन, सिध्दार्थ नगर, रहाटणी, पुणे | सिध्दार्थ नगर, रहाटणी, काळेवाडी | इंग्रजी | १ ली |

एकुण :- ०५ ( पाच ) प्राथमिक शाळा.

Headmaster
Vidyaniketan English Medium School
Chakan.Tal.Khed.Dist.Pune 410501